**महसूल विभागांतर्गत उप जिल्हाधिकारी संवर्गातील उप जिल्हा निवडणूक अधिकारी या पदावरील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवालासाठी प्रतिवेदन प्राधिकारी (Reporting Authority) आणि पुनर्विलोकन प्राधिकारी (Reviewing Authority) घोषित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ०४२६/प्र.क्र.९५/आस्था-२ (ई-१६४२१११)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि.०६ मे, २०२६.

**प्रस्तावना :-**

लोकप्रतिनिधत्व अधिनियम, १९५० च्या कलम १३-अ नुसार भारत निवडणूक आयोगाच्या अधिनस्त, नियंत्रण व आदेशानुसार निवडणूकांची कामे करण्यासाठी प्रत्येक राज्याकरीता मुख्य निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येते. याच कायद्यातील तरतुदीनुसार राज्यातील निवडणूका व मतदार याद्यांची कामे करण्याकरिता राज्यस्तर व क्षेत्रीय स्तरावर विविध पदांची निर्मिती मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेली आहे. राज्यातील निवडणूका स्वच्छ व निरपेक्ष वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाची आहे. त्यासाठी महसूल विभागाच्या अधिनस्त विविध संवर्गात एकूण १३७५ इतकी पदे निर्माण करण्यात आली असून निवडणूक कार्यालयाच्या अधिनस्त क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयाद्वारे निवडणूक विषयक कामे नियमितपणे सुरु असतात. त्यामध्ये प्रामुख्याने मतदार याद्यांमध्ये सुधारणा करणे, नवीन मतदारांची नोंदणी करणे, मयत, दुबार मतदारांची नावे वगळणे तसेच नाव, पत्ता इ. मध्ये दुरुस्ती करणे, मतदार जनजागृती करणे, मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे, विधानसभा तसेच लोकसभा पोटनिवडणूकीसंबंधाचे कामकाज पार पाडणे, महाराष्ट्र विधानपरिषद व्दिवार्षिक निवडणूकीचे कामकाज पार पाडणे, शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूकीचे कामकाज करणे इ. निवडणूकीसाठीची क्षेत्रीय कार्यालयातील पदे निवडणूक कार्यालयाच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहेत. तथापि, उक्त शासन निर्णयामध्ये सदर पदांमधील वाढ ही महसूल संवर्गातील तात्पुरती वाढ समजण्यात यावी, असे नमुद केले आहे. म्हणजेच सदर पदे महसूल विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. तसेच सदर पदांवरील अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या / पदोन्नत्या इ. बाबी महसूल विभागामार्फत हाताळण्यात येतात.

२. निवडणूक कार्यालयाच्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेल्या जिल्हास्तरावरील पदांमध्ये उप जिल्हा निवडणूक अधिकारी हे महत्वाचे असून त्या पदावर महसूल विभागातून उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. सदर पदावरील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल संबंधित जिल्हाधिकाऱ्यामार्फत पुनर्विलोकनासाठी ऑनलाईन पध्दतीने संबंधित विभागीय आयुक्तांना (MahaPAR वर) सादर करण्यात येतात. तथापि, उप जिल्हा निवडणूक अधिकारी या पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांकडे केवळ निवडणूकविषयक कामकाज सोपविलेले असून सदर अधिकाऱ्यांकडे महसूल विभागाचे अन्य कोणत्याही कामकाजाची जबाबदारी देण्यात येत नाही. म्हणजेच सदर अधिकारी हा केवळ निवडणूक कार्यालयाच्या

अधिपत्याखाली कार्यरत असून त्यांच्याकडे निवडणूक वगळता अन्य कोणतेही कामकाज सोपविण्यात येत नाही. त्यामुळे उक्त अधिकाऱ्यांच्या कामाचे पुनर्विलोकन अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या व्यतिरिक्त अन्य अधिकाऱ्यांनी करणे संयुक्तिक होणार नाही. त्यामुळे, ज्या कालावधीसाठी सदर अधिकारी उप जिल्हा निवडणूक अधिकारी या पदावर कार्यरत असेल त्या कालावधीचे सदर अधिकाऱ्याच्या गोपनीय अहवालाचे पुनर्विलाकन अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी करणे संयुक्तिक राहील. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन परिपत्रक :-**

उप जिल्हा निवडणूक अधिकारी या पदावर महसूल विभागातून उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. तरी उप जिल्हा निवडणूक अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवालासाठी संबंधित जिल्हाधिकारी हे प्रतिवेदन प्राधिकारी (Reporting Authority) आणि अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य हे पुनर्विलोकन प्राधिकारी (Reviewing Authority) राहतील. प्रतिवेदन वर्ष २०२५-२६ पासूनच्या गोपनीय अहवालांचे संस्करण करताना वरीलप्रमाणे प्रतिवेदन प्राधिकारी व पुनर्विलोकन प्राधिकारी राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०५०६१२१८१९०११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.05.06 12:19:22 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास/गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. उप सचिव (आस्था-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. निवडनस्ती (कार्यासन आस्था-२).